समविचारी ग्लोबल साउथ देश आणि मित्र देशांची उच्च-स्तरीय मंत्रिस्तरीय बैठक

संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या 81व्या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर 22 सप्टेंबर 2026 रोजी न्यूयॉर्क येथे, समविचारी ग्लोबल साउथ देश आणि मित्र देशांची उच्च-स्तरीय मंत्रीस्तरीय बैठक पार पडली. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या अध्यक्षतेखाली "उज्ज्वल भविष्याकडे एकत्रितपणे वाटचाल – सक्षम ग्लोबल साउथची अपरिहार्य गरज" या संकल्पनेअंतर्गत बैठक पार पडली.

2. सध्याच्या जागतिक परिस्थितीत ग्लोबल साउथ देशांसमोर असलेल्या आव्हानांवर सहभागी देशांनी चर्चा केली. यामध्ये अन्न आणि ऊर्जा सुरक्षेवर परिणाम करणारे सुरू असलेले संघर्ष, व्यापार आणि गुंतवणुकीच्या प्रवाहातील अस्थिरता, सुरू असलेल्या संघर्षांमध्ये नाविकांच्या सुरक्षेबाबतच्या चिंता, तीव्र हवामानविषयक घटना तसेच शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यात होत असलेला विलंब यांचा समावेश होता.

3. सहभागींनी बहुपक्षीय संस्था कमकुवत होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आणि ग्लोबल साउथ देशांवर विपरीत परिणाम करणाऱ्या वर्तमान जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी विशेषत: संयुक्त राष्ट्रांमध्ये व्यापक सुधारणांच्या तातडीच्या गरजेवर भर दिला.

4. सहभागी देशांनी जागतिक आणि प्रादेशिक घडामोडींवर तसेच बहुपक्षीय मंचांवर ग्लोबल साउथ देशांनी समन्वय साधण्याच्या गरजेवर विचारांची देवाणघेवाण केली. परस्पर सामर्थ्यांचा लाभ घेत तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा मानवकेंद्रित पद्धतीने वापर करून दक्षिण-दक्षिण सहकार्याचा विस्तार करण्याचा त्यांनी संकल्प केला.

5. सामूहिक भूमिका अधिक दृढ करण्यासाठी तसेच संतुलित, सहभागी आणि न्याय्य जागतिक प्रशासनाच्या व्यवस्थेसाठी प्रयत्न सुरू ठेवण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा सहभागी देशांनी पुनरुच्चार केला.

न्यूयॉर्क

22 सप्टेंबर 2026